www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 315 मंगळवार दि. 29 जुलै २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात

**शिवाजी पार्कजवळ कचऱ्याचा ढीग...**

## स्वच्छतेला तडा!



**फोटोतून शासनदरबारी आवाज पोहोचवत आहेत**

दैनिक व आधारचे लातूर प्रतिनिधी
मयुर प्रकाश धुरी

**सेनापती बापट चौक, शिवाजी पार्क – गेल्या अनेक दिवसांपासून कचऱ्याचा मोठा ढीग नजरेआड नाही, पण प्रशासनाच्या दुर्लक्षात आहे.**
**दादर चौपाटी, शाळा, रुग्णालय, मैदान, चैत्यभूमीकडे जाणाऱ्या नागरिकांना रोज दुर्गंधीतून वाट काढावी लागते!**

**"स्वच्छ मुंबईचं स्वप्न... कचऱ्यात गाडलं जातंय!" तातडीने स्वच्छता व्हावी, हीच नागरिकांची अपेक्षा !**

**प्रशासन जागे होईल तेव्हा होईल... पण तोपर्यंत ही सत्य दृश्यं शासनाच्या दरबारात पोहोचवणे हीच आमची जबाबदारी.**

# घोटाळ्यात उपघोटाळा; ९ हजारांवर सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी घेतला 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ




दैनिक युवक आधार
मुंबई : लाडकी बहीण योजनेत झालेले एकेक घोटाळे आता समोर येत आहेत. १४ हजारांवर पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे वृत्त 'लोकमत'ने आधीच दिलेले असताना आता ९,५२६ राज्य सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ उचलल्याचे निदर्शनास आले आहे. धक्कादायक म्हणजे, राज्य सरकारी सेवेतून निवृत्त झालेल्या महिला कर्मचारी एकीकडे निवृत्तीवेतन घेत असताना 'लाडकी बहीण'चे महिन्याकाठी १,५०० रुपयेही त्यांच्या खात्यात जमा होत होते. 'लोकमत'कडे याबाबतची अधिकृत आकडेवारी आहे. या योजनेतील पुरुष लाभार्थी शोधताना रेशन कार्डचा आधार सरकारने घेतला होता. आता सरकारी कर्मचाऱ्यांबाबत छाननी करताना सेवार्थ प्रणालीचा आधार घेण्यात आला आणि त्यातून ही गडबड ध्यानात आली.

# अलिबाग पोलिसांची बेकायदा गुटखा विक्रीवर धडक कारवाई

## ४ लाखांचा मुद्देमाल जप्त, दोन आरोपी गजाआड




दैनिक युवक आधार
निलेश फुंडे रेवदंडा
राज्यात गुटखा विक्रीवर बंदी असतानाही अलिबाग परिसरात सर्रासपणे सुरू असलेल्या बेकायदा गुटखा विक्रीवर अलिबाग पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. दोन वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या कारवाईत पोलिसांनी एकूण ४ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत दोन आरोपींना अटक केली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग शहरातील हरीष बेकरी समोरील रस्त्यावर एका पांढऱ्या रंगाच्या कारमधून गुटख्याचा मोठा साठा येणार असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पाळत ठेवून कार अडवून तपासणी केली असता, कारमधून ६२ हजार रुपये किमतीचा पानमसाला, तंबाखू व इतर गुटखा प्रकार सापडले. कारचालक नकुलकुमार नंदलाल चौरसीया याला त्वरित अटक करण्यात आली.तपासाअंती आरोपी नकुलकुमार याने राम केवल रामप्रसाद निशाद (रा. वायशेत, अलिबाग; मूळ गाव उत्तर प्रदेश) याला गुटखा विकल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी वायशेत मधील निशादच्या घरावर छापा टाकला असता, ५४ हजार ५९१ रुपये किमतीचा सुगंधित पानमसाला, तंबाखू, चरससदृश गोळ्या आणि अन्य प्रतिबंधित साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे अलिबागमधील किरकोळ गुटखा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे

महाराष्ट्र शासनाने गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी घातलेली असूनही, काहीजण मानवाच्या जीविताला धोका निर्माण करणारे पदार्थ विक्रीस ठेवत असल्याचे या प्रकरणातून उघड झाले आहे.या दोन्ही आरोपींविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान आणि अन्न सुरक्षा कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सुरू आहे. पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात आली.

# माहेरी आलेल्या महिलेचा विहिरीत मृतदेह आढळल्याने खळबळ

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी
राजेश भडांगे
विंचूर :– दिंडोरी तालुक्यातील सासर असलेल्या ३५ वर्षीय महिलेचा माहेर असलेल्या खेरवाडी ता.निफाड येथील विहिरीत पडून मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे.



सविता भुषण बोरस्ते, वय ३५ या महिला आपल्या माहेरी खेरवाडी ता.निफाड येथे काही दिवसांपूर्वी आल्या होत्या. शुक्रवार, दि. २५ जुलै रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास त्या घरासमोरील विहिरीत पडल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांना तातडीने चांदोरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारार्थ दाखल केले. मात्र, तपासणीनंतर वैद्यकीय अधिकारी डॉ. इरेश पाटील यांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी सायखेडा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू र.नं. ४३/२०२५, भा.न्या. सं. १९४ नुसार नोंद करण्यात आली आहे. स.पो.नि.विकास ढोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हवा.गायकवाड अधिक तपास करीत आहेत.



**दैनिक युवक आधार – अखिल आर्यवत संघ आंतरराष्ट्रीय बजरंग दल रायगड विभाग पनवेल विधानसभा तर्फे खांदेश्वर शिवमंदिर ते गाढेश्वर शिव मंदिर अशी 'शिवकावड यात्रा' आयोजित करण्यात आली होती. या शिवकावड यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून भगवान शिव शंकरांचे दर्शन घेतले व सर्वांना कावड यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या. दरम्यान या कार्यक्रमाला आचार्य महामंडलेश्वर योगी सिद्धनाथ आघोर हे देखील उपस्थित होते. तसेच आयोजक अखिल आर्यवत संघ आंतरराष्ट्रीय बजरंग दलचे पदाधिकारी उपस्थित होते.**



ठिकाण - शांतिनिकेतन पब्लिक स्कूल, सेक्टर 2, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
संपर्क - 9769357171 / 9702153851 / 8928294945

# 50 मंदिरांजवळ वृक्षारोपण करत केले वाढदिवस साजरे

दैनिक युवक आधार
उरण रायगड. प्रतिनिधी रणिता ठाकूर
जे पेराल तेच उगवेल मग आपण चांगलं कर्म पेरलं तर चांगली कृती व तिचे आसपास पडसाद उत्तम होऊन त्याची वृद्धी दिसेल वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे. संत तुकारामानीं आपल्या अभंगात निसर्गाचे वर्णन सोळाव्या शतकात केले आहे. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे! पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे.आजची परिस्थिती पाहिली तर या भूतलावर वृक्षांची संख्या आणि प्रत्यक्ष मानव वापरत असलेल्या आपल्या गरजेसाठी ह्याचे प्रमाण पाहिले तर विषम होत आहे. या वरून समजते की वृक्षारोपण हे किती महत्वाचे आहे. यासाठी हे कार्य प्रत्येकाने हाती घ्यायला हवे. प्रत्येकाला अध्यात्मिक आवड असते. एखाद्याच्या निसर्ग प्रेमी साठी वाढदिवसाची एक अनोखी व नवखी भेट म्हणून पर्यावरण पूरक उपक्रम म्हणून आवरे गावातील निवास गावंड सर यांनी राबविला गावंड सर हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या सुपरीचीत उपक्रमासाठी सतत चर्चेत असतात मग विद्यार्थ्यांना प्रोत्साहन असो, शैक्षणिक सामाजिक असेल किंवा धार्मीक असो किंवा पर्यावरण शी संबंधित असो ते स्वतःला या कामात व्यस्त ठेवत असतात. निवास गावंड सर यांनी आज हे काम आपले मित्र सारडे विकास मंच चे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे सर एक निसर्गप्रेमी एक वृक्षप्रेमी उरण तालुक्यातील एक आदर्श व्यक्तिमत्व ह्या किमयागाराने सारडे गावातील ओसाड माळरानावर गेली 12 वर्ष मेहनत करत जून एक तप करत कोमनादेवी ऑक्सिजन पार्क तयार करून तरुणाई पुढे आदर्श निर्माण केला आहे. आशा आदर्श व्यक्तिमत्त्वास एक पर्यावरण पूरक उपक्रम भेट म्हणून सुयश क्लासेस आवरे चे निवास गावंड सर यांच्या कडून ५० व्या वाढदिवसी ५० धार्मीक मंदिरात ५० वृक्षारोपण करण्याचा एक निराळा संकल्प करून तो पूर्णपणे करून दाखविला या मध्ये उरण पेण पनवेल अलिबाग येथील मंदिराचा समावेश करण्यात आला तुळशी चे झाड हे अधिक प्रमाणात ऑक्सिजन देत असते आणि भगवान विष्णू ना तुळस प्रिय असते म्हणून तुळशीच्या झाडाचे व इतर फुलांच्या झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले असा हा स्तुत्य असा उपक्रम राबविला नक्की पर्यावरण प्रेमी हे अश्या प्रकारच्या उपक्रमाचा संदेश हा सर्वांपर्यंत पोहचेल अश्या प्रकारे अध्यात्म आणि पर्यावरण याची सांगड



घालत आपल्या मित्राच्या ५० व्या वाढदिवशी ५० धार्मिक मंदिरात केले ५० वृक्षांचे वृक्षारोपण केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहिजे असा अट्टाहास धरायला हवा.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या जिल्हा समवाद समितीच्या सदस्यपदी अ‍ॅड.घुले व अ‍ॅड.तलांडे यांची नियुक्ती

दैनिक युवक आधार
किनवट प्रतिनिधी विशाल भालेराव
किनवट,दि.२८: जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या जिल्हा समवाद




समितीच्या पॅनल विधीज्ञ सदस्यपदी किनवट न्यायालयातील अड.घुले पंडीत गंगाराम व अड सचिन प्रकाश तलांडे यांची नियुक्ती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अध्यक्ष सुनिल गं. वेदपाठक व सचिव शरद जी. देशपांडे यांनी नुकतीच केली आहे.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या पत्राच्या निर्देशानुसार नांदेड जिल्हयाकरीता अतिदक्ष, असुरक्षित आणि विमुक्त/भटक्या जमातींसाठी न्यायाची उपलब्धता मजबूत करणे यासाठी समितीचे गठन करण्यात आले आहे.या समितीचे सर्व सदस्य अध्यक्षांच्या निर्देशानुसार कार्य करतील. त्यानुसार विशेष मोहिमे राबवून तसेच जनजागृती करून त्या घटकांना समाज प्रवाहातील प्रत्येक योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी काम करतील.

## विद्यार्थ्यांना पेन-वहीचे वाटप

दैनिक युवक आधार
उपसंपादक महाराष्ट्र राज्य राजू शिंदे (मंठा)
: मंठा तालुक्यातील तळणी येथील जिल्हा परिषद शाळेत शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना पेन-वही आणि मिठाईचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना उबाठा गटांचे तालुका संघटक ज्ञानेश्वर माऊली सरकटे यांच्या प्रमुख उपस्थितीत युवासेना उपजिल्हा प्रमुख संदीप सरकटे व युवासेना उपतालुका प्रमुख आवेश पठाण यांनी उपक्रम राबविला . यावेळी सुखदेव हानवते, सदाशिव लाड, गजानन पातळे, ज्ञानेश्वर येऊल, भागवत कंबळकर, जुनेद बागवान, भागवत सरकटे, ऋषी देशमुख, साबेर शेख, प्रज्वल पन्हाळकर, आकाश गुडघे, ओम हानवते, राहुल भारस्कर, तनवीर पठाण, विशाल हानवते आदी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



# व्यसनाच्या आहारी गेला होता म्हणून भावाला संपविले, ताम्हिणी घाटातील खून प्रकरणाचा झाला उलगडा !वारजे माळवाडी पोलिसांनी भावाला ठोकल्या बेड्या.!!

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी संतोष लांडे पुणे : राज्यांत सध्या गुन्हेगारी चांगलीच वाढली आहे. राज्यांतील वेगवेगळ्या भागांतून दररोज खून,मारामाऱ्या, लुटमार,दरोडे या सारख्या घटना उघडकीस येत असतात. मात्र महाराष्ट्रांतील पोलीस प्रशासनही तितकेच प्रयत्नशील, आहे. अशातच आता पुण्यातून दोन दिवसांपूर्वी ताम्हिणी घाटातील खुनाचा गुन्हा उघड करण्यात वारजे माळवाडी पोलिसांना यश मिळाले आहे. ताम्हिणी घाटात आढळून आलेल्या अनोखी तरुणाच्या हत्येचा अखेर तपास उलगडण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. या प्रकरणात वारजे माळवाडी पोलिसांनी खून झालेल्या तरुणाच्या मोठ्या भावाला बेड्या ठोकल्या आहेत. ऋषिकेश अनिल शिर्के (वय 23) रा. गायकवाड चाळ कर्वेनगर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर ऋषिकेशचा मोठा भाऊ अनिकेत अनिल शिर्के (वय 26) याला अटक करण्यात आली आहे. आपला लहान भावाच्या व्यसनाधीनमुळे दोघांमध्ये वाद निर्माण झाला होता. आणि याच वादांतून त्याने आपल्या लहान भावाचा खून केला होता. तपासाच्या अनुषंगाने आरोपीला भावाला ताब्यात घेतल्यानंतर आरोपी अनिकेतने अखेर खूनाची कबुली पोलिसांना दिली आहे. सदर प्रकरणाचा अधिक तपास पौंड पोलीस करीत असून परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम आणि सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब पटारे यांच्या



मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रकाश धेंडे गुन्हे पोलीस निरीक्षक निलेश बडाख आदीं पोलिसांनी या खुनाच्या तपासात सहभाग घेवुन तपास पथकांने ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली आहे.*

# बारामतीत भीषण अपघात: वडिलांसह दोन मुलींचा जागीच मृत्यू



दैनिक युवक आधार
प्रतिनिधी संतोष लांडे पुणे
सणसर गावासह संपूर्ण बारामती परिसरात शोककळा पसरली आहे. एकाच कुटुंबातील तिघांचा या अपघातात बळी गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मोरगाव रस्त्यावरील महात्मा फुले चौकात रविवारी (२७ जुलै २०२५) सकाळी साडेअकराच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातानेबारामती शहर हादरले. डंपर आणि दुचाकीच्या धडकेत एका कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात दुचाकी (MH 16 CA 0212) डंपरच्या चाकाखाली सापडल्याने वडिलांसह त्यांच्या दोन मुली चिरडल्या गेल्या. खंडोबा नगर परिसरातील या वर्दळीच्या ठिकाणी झालेल्या अपघातात ओंकार आचार्य (मूळ रा. सणसर, ता. इंदापूर, सध्या रा. मोरगाव रोड, बारामती) यांच्यासह त्यांच्या दोन मुली सई (वय १० वर्षे) आणि मधुरा (वय ४ वर्षे) यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर सई आणि मधुरा यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.या दुर्दैवी घटनेने सणसर गावासह संपूर्ण बारामती परिसरात शोककळा पसरली आहे. एकाच कुटुंबातील तिघांचा या अपघातात बळी गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी अपघाताची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# SSC BATCH 2006-07 च्या विद्यार्थ्यांनी केला 18 वर्षांनी स्नेह संमेलन साजरा

दैनिक युवक आधार
उरण प्रतिनिधी हेमाली पाटील
कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन, उरण या शाळेत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांचे रविवार दि. 27 जुलै 2025 रोजी स्नेह संमेलन आनंदात संपन्न झाले. शाळा सोडून 18 वर्षे पुर्ण झाली, तरीही मैत्रीत तोच गोडवा, जिव्हाळा आहे. SSC BATCH 2006-07 मधील मित्र मैत्रिणींनी एक दिवस एकत्र येऊन आपल्यातील मैत्री ताजी केली. या गेट टुगेदर ला एकूण 40 हुन अधिक मुले-मुली जमल्या. आपल्या दैनंदिन जीवनातून स्वतः साठी, मैत्रीच्या नात्यासाठी फार्म हाऊस वर येऊन खूपच धम्माल, मस्ती करत सुखद आठवणी दिल्या. शाकाहारी, मांसाहारी जेवण सर्वानी मिळून केले. कोणत्याही वस्तूची कमतरता पडू न देणारे मित्र आणि त्यांचे नियोजन कौतुकास्पद आहे. नाचणे, गाणे, खेळणे, मस्ती करणे, खोड्या करणे अशा साऱ्यांनी बहरलेला हा दिवस प्रत्येकाच्या मनाला स्पर्श करत होता.शाळेच्या जुन्या आठवणी बोलक्या



केल्या. एकमेकांची विचारपूस करणे, शिक्षकांची आदराने आठवण काढणे, त्यावेळी झालेल्या निरागस भांडणे, मधल्या सुट्टीत खाल्लेलं वडापाव, डबा...... आणि बऱ्याच जुन्या आठवणींना उजाळा देत हसत खेळत केक कापून या खास दिवसाची सांगता केली. जाता जाता पुन्हा नव्याने एकत्र येण्याचं वचन साऱ्यांनीच दिलं. सूर्य मावळत होता पण मैत्रीचे लखलखीत तेज प्रत्येकाच्या डोळ्यात चमकत होते. ही ऋणानुबंधाची गाठ सदैव अशीच राहो. आपल्या या भेटीने पुन्हा एकदा सिद्ध केलं की वर्षं जरी बदलली, आयुष्य वेगळ्या वाटांवर गेलं, तरी मनातली मैत्री मात्र कायम तीच राहते निर्मळ, निस्सीम आणि आपुलकीची.

# सारोळेथडी नांदुर मध्यमेश्वर रस्त्यासाठी मंत्री भुजबळांकडे मागण्यांचे निवेदन

दैनिक युवक आधार
*नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी
निफाड तालुक्यातील पूर्व भागातील गोदावरी नदीच्या तीरावरील पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या नांदूरमध्यमेश्वर,सारोळेथडी एकेरी रस्त्यांची भयावह परिस्थिती झाली असुन रस्त्याची खड्ड्यांनी अक्षरशः चाळण झालेली आहे रस्त्यांच्या दोन्ही बाजुला काटेरी झाडाझुडपांनी वेढलेले असल्यामुळे समोरून वाहन येत असतांना दुसऱ्या वाहन धारकास थांबून घ्यावे लागत आहे. वाऱ्याच्या झोकात व समोरून येणाऱ्या वाहनामुळे मोटरसायकल स्वारांना काटीचा फटका चेह-याला बसून डोळे निकामी होण्याची शक्यता असल्याने बऱ्याच वेळेला लहानमोठे अपघात घडल्याचे निदर्शनात आल्यानतंर सारोळेथडी येथील सामाजिक कार्यकर्त्या व निफाड तालुका पुर्वच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महिला अध्यक्ष सुरेखाताई अशोकराव नागरे डॉ. वैशाली पवार यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा येवल्याचे भाग्यविधाते छगनराव भुजबळ साहेब यांना निवेदन देण्यात आले.विचुर प्रकाशा ते पांगरी, नांदूरशिगोंटे संगमनेर पुणे जाणेकरीता दळणवळणाच्या दृष्टीने महत्वपूर्ण मार्ग असल्याने
विंचूर म्हसोबामाथा ते खेडले झुंगे ह्या रस्त्यांचे काम गुणवत्ता पुर्वक दर्जेदार होत असून भुजबळ साहेबांनी एवढा मोठ रस्ता देवून न भूतो ना भविष्यती काम करून धारणगाववीर सारोळे थडी गावांचे महत्व वाढवल्यामुळे सारोळेथडी ग्रामस्थांनी भुजबळ साहेबांचे आभार मानले.



# भारत सरकार नोंदणीकृत ग्राहक रक्षक समितीच्या महिला विभाग राष्ट्रीय उपाध्यक्षपदी डॉ. तरन्नुम शेख यांची निवड

दैनिक युवक आधार
नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी
भारत सरकार नोंदनीकृत ग्राहक सेवा बहुउद्देशीय संस्था संचलित ग्राहक रक्षण समितीच्या राष्ट्रीय महिला विभाग उपाध्यक्ष पदी डॉ. तरन्नुम शेख यांची नेमणुक करण्यात आल्याची घोषणा राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष डॉ.सौ आशाताई पाटील यांनी केली. डॉ. तरन्नुम शेख यांच्या निवडी नंतर ग्राहकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. डॉ. तरुन्नुम शेख ह्या मिस दुबई असुन सामाजिक कार्याची त्यांना आवड असुन शांत, संयमी, अभ्यासू सुंदर, शालिन असून विविध क्षेत्रात भारतभर नावलौकिक मिळवुन अनेक संस्था संघटनांचे राज्यस्तरीय व राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कार प्राप्त असून डॉ. तरन्नुम शेख मॅडम ग्राहक रक्षक

आपल्या हक्कासाठी, आपल्या अधिकारासाठी, आपल्या विश्वासाची एकमेव संस्था
ग्राहक सेवा
सामाजिक बहुउद्देशीय संस्था

समितीच्या राष्ट्रीय महिला उपाध्यक्षपदी निवड ग्राहक रक्षण समितीच्या राष्ट्रीय संस्थापक अध्यक्षा डॉ. सौ. आशाताई पाटील यांनी सदर नियुक्ती केली. यावेळी राष्ट्रीय मार्गदर्शक दिलीप फडोळ पाटील, राष्ट्रीय मार्गदर्शक अरविंद तात्या सोनवणे महिला राष्ट्रीय अध्यक्ष ज्योती केदारे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. जानकी पराग नाईक, राष्ट्रीय उपाध्यक्ष योगेश मालुंजकर राष्ट्रीय सचिव हर्षद गायधनी किशोर ओसवाल ग्राहक रक्षण समितीचे राष्ट्रीय पदाधिकारी व कोअर कमिटीने नियुक्ती केल्याबद्दल डॉ. तरन्नुम शेख यांना विविध सामाजिक, अध्यात्मिक शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या डॉ. तरन्नुम शेख यांची नियुक्ती ग्राहक रक्षण समितीचे संस्थेसाठी आणि ग्राहकांच्या हितासाठी खूप महत्वाची ठरेल. आजच्या डिजीटल युगात फसवणुकीचे प्रकारही हायटेक झाले आहेत ग्राहकांची दिशाभुल करणे चुकीची माहीती देणे, चुकीच्या सवलतीचे आमिष दाखवणे हे सर्व प्रकार



ग्राहकांच्या विश्वासावर आघात करत असल्याने त्यांच्या हातून समाजकार्य आणि ग्राहकांच्या हितासाठी न्याय व हक्कासाठी .. झोकून अधिक जबाबदारीने काम करणार असल्याचे यावेळी राष्ट्रीय संस्थापक अध्यक्षा डॉ. सौ आशाताई पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बोलतांना सांगितले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संघ, द्रोणागिरी आणि डी. वाय. पाटील हॉस्पिटल नेरुळ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबीर संपन्न

दैनिक युवक आधार
तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी
डॉ..बाबासाहेब आंबेडकर सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संघ, द्रोणागिरी ही संस्था शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासावर लक्ष केंद्रित करुन विविध उपक्रम राबवत आहे. त्यामुळे समाजातील सर्व घटकांच्या विकासाला मदत होत आहे. ही संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आणि त्यांच्या कार्यावर मार्गस्थ आहे.

शनिवार दिनांक २६ जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत प्रणव कॉर्नर गाळा क्र.६ से.५५ द्रोणागिरी उरण येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक संघ द्रोणागिरी आणि डी वाय पाटील हॉस्पिटल नेरूळ यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात तज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी केली. रक्त तपासणी, इ.सी.जी. ,स्त्रीरोग तज्ञ ,जनरल सर्जरी तज्ञ मार्गदर्शन,अस्थिरोग तज्ञ तसेच मोफत औषधे वाटप करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संघ, द्रोणागिरी आणि डी वाय पाटील हॉस्पिटल, नेरुळ यांनी आयोजित केलेल्या या शिबिरासाठी द्रोणागिरी व आसपासच्या परिसरातील रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला व आपली आरोग्य तपासणी केली.

सदरचे आरोग्य शिबीर उत्तमरीत्या संपन्न होण्यासाठी डी वाय पाटील नेरूळ हॉस्पिटल चे डॉ. यशवंते साहेब व त्यांचे सहकारी, डॉ. डेरे मॅडम ,शिंदे मॅडम आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक संघ द्रोणागिरी संघाचे सर्व पदाधिकारी यांनी प्रामुख्याने महत्त्वाची भूमिका बजावली.

डी वाय पाटील हॉस्पिटल व संशोधन केंद्र नेरूळ यांच्याकडून डी वाय पाटील रुग्णालयाचे अध्यक्ष मा. डॉ. विजय डी पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाने गोरगरीब रुग्णांसाठी अत्यंत अल्पदरात विविध शास्त्रक्रिया "डॉ.विजय पाटील योजना" अंतर्गत उपलब्ध केलेल्या आहेत. सवलतीच्या व अल्प दरातील शस्त्रक्रियेची मध्ये कान नाक घसा, अपेंडिक्स, हर्निया, पित्ताशयातील खडे, मुतखडे, डिलिव्हरी , गर्भपात हायड्रोसिल, महिलांच्या गर्भाशय शस्त्रक्रिया, टॉन्सिल्स ,मूळव्याध, लहान मुलांच्या शस्त्रक्रिया आणि इतर शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात केल्या जातील. अशा आरोग्य सुविधांसाठी अधिक माहिती हवी असेल तर ९८२१२३३९२३ / ७३०४९८६०६६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संघ, द्रोणागिरी तथा ६५६७ ५९०१ किंवा ८९२८८५१६५७ सुदर्शना शिंदे यांच्या संपर्क क्रमांकावर संपर्क साधा.



दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

### कविता

**नाग पिल्ली ..**

नाग पंचमी आली
नागाचीसेना भ्याली
शिव शंभोला शरण
तुम्ही आमचे वाली

नाग पुजा करायची
इच्छा जागृत झाली
गारूडी लागे पकडू
नागसापाची पिल्ली

नागाला दुरडी भरुन
फिरता गल्लो गल्ली
नागासह सेल्फी घ्या
टूम निघालीयं हल्ली

नागापेक्षाही विषारी
आहेत काही वल्ली
संस्कृती काय सांगे
कसे करी पायमल्ली

महत्व नकळे सणाचे
उत्साहे आम्ही टल्ली
फुत्कार पहा नागाचे
कंबर होईलं ढिल्ली

नागसापांचे संरक्षण
शक्कल भलीचांगली
जाणा सणाचे महत्त्व
उडवू नकात खिल्ली

– हेमंत मुसरीफ पुणे

# ₹नाच गं घुमा पनवेल₹ तर्फे मंगळागौरीचा जल्लोषात कार्यक्रम

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी )श्रावण महिन्याच्या स्वागतासाठी "नाच गं घुमा पनवेल" या महिलावर्गीय सांस्कृतिक मंडळातर्फे एक आगळावेगळा मंगळागौरीचा कार्यक्रम पनवेलमधील दास मारुती मंदिर येथे उत्साहात पार पडला.या कार्यक्रमात पनवेलमधील विविध महिलामंडळांना आमंत्रित करून पारंपरिक खेळ, उखाणे, प्रश्नमंजुषा, आणि सांस्कृतिक स्पर्धांद्वारे श्रावण साजरा करण्यात आला. सततच्या पावसाचं आव्हान झुगारून महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विशेष म्हणजे, एक घरकाम करणाऱ्या महिलेला प्रमुख पाहुण्या म्हणून आमंत्रित करून तिच्या हस्ते आरती करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ही स्तुत्य कल्पना उपस्थितांनी विशेषत्वाने गौरवली.

कार्यक्रमामध्ये फुगड्या, झिम्मा, किकीचं पान, दिंड्या यांसारखे पारंपरिक खेळ खेळण्यात आले. यावेळी "दीपक साडी स्टोअर" प्रायोजित उखाणे स्पर्धा आणि "वेदा आर्ट" प्रायोजित प्रश्नमंजुषा स्पर्धा यामध्ये



महिलांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. विजेत्यांना साड्या, नथ यांसारखी आकर्षक बक्षिसे देण्यात आली. तसेच, विशेष आकर्षण ठरली ती "श्रावण क्वीन" स्पर्धा, ज्यात वेशभूषा, खेळातील सहभाग व उत्साहावरून तीन महिलांना गौरवण्यात आले. सर्व उपस्थित महिलांना "अंकित ज्वेलर्स" तर्फे एक खास भेटवस्तू देण्यात आली. कार्यक्रमाच्या सांगतेस स्वादिष्ट अल्पोपहाराने महिलांनी मनमुराद आनंद लुटला. "नाच गं घुमा" ग्रुपच्या सख्यांनी उत्तम आयोजन करत पनवेल परिसरातील महिलांना श्रावणाचा उत्सवप्रसंग मोठ्या आनंदात साजरा करण्याची संधी दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दास मारुती मंदिर ट्रस्ट, प्रायोजक संस्था आणि सहभागी महिलामंडळांचे विशेष आभार मानण्यात आले. संस्कृती जपत पुढे जाण्याचा निर्धार करत, "नाच गं घुमा पनवेल" ग्रुपकडून अशाच अनेक उपक्रमांची घोषणा लवकरच होणार आहे.

## आर्णी येथील आदिवासी सरपंच संघटनेचे तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

> आदिवासी मंत्री व इतर आदिवासी समाजातील आमदार, तत्सम पदावर असलेल्या नेत्यांबद्दल परत कधीही कोणीही अपशब्दांचा प्रयोग केल्यास आदिवासी समाज हे सहन करणार नाही, व तीव्र आंदोलन करू असा इशारा ही त्यांनी दिला.

दैनिक युवक आधार
आर्णी प्रतिनिधी : महाराष्ट्रात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असून, राजकीय क्षेत्रात असल्याप्रमाणे शैक्षणिक क्षेत्रात सुद्धा सवलत आहे, मात्र या सवलतीच कोणत्याही प्रकारे फायदा होतांना दिसत नसल्याचे सांगत, तालुक्यातील आदिवासी बांधव त्यांच्या समाजातील पुढारी व सर्व सरपंच यांच्या समवेत तहसीलदार कार्यालयावर धडकले. मागील काही दिवसांपासून हिंगोली येथे आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांचे 12500 पदभरती भरण्याकरिता साखळी उपोषण सुरू आहे, शासनाने धोरणे व केलेल्या आश्वासनानुसार त्वरित पदभरती करावी अशी अट घेऊन उपोषण सुरू आहे. त्या उपोषणाला पाठिंबा व जुन्नर येथील आमदार यांनी आदिवासी समाजाचे नेते मंत्री श्री अशोक उईके यांच्या बद्दल अपशब्द प्रयोग केल्यामुळे त्या आमदारावर योग्य ती कार्यवाही करावी करीता निवेदन देण्यात आल्याचे सांगितले.




# पनवेल बस आगारात नवीन बसेस दाखल

## "प्रितम म्हात्रेंच्या हस्ते नारळ फोडून लोकार्पण"

सुरक्षित, सोयीस्कर आणि आधुनिक प्रवासा करीत पनवेल बस आगारात नवीन बसेस दाखल झाल्या. त्याचा नागरिकांना भविष्यात उपभोग घेता येईल. पनवेल बस आगार नव्याने निर्मितीसाठी काही त्रुटी निर्माण झाल्यामुळे काम थांबले आहे. संबंधित विभागाशी योग्य तो पाठपुरावा करून लवकरच प्रवाशांना आगारामध्ये मिळणाऱ्या सुख सुविधा त्यांना उपभोगता येतील यासाठी आम्ही पाठपुरावा घेणार आहोत.

प्रितम जनार्दन म्हात्रे
मा.विरोधी पक्षनेते पनवेल महानगरपालिका

दैनिक युवक आधार
पनवेल वार्ताहर
महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री श्री अजितदादा पवार, परिवहन मंत्री श्री.प्रतापजी सरनाईक, परिवहन राज्यमंत्री श्रीमती माधुरीताई मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राची विकासाची घोडदौड सुरू आहे.

त्याचाच एक अध्याय म्हणून पनवेलचे आमदार श्री.प्रशांतजी ठाकूर आमदार श्री. विक्रांतजी पाटील यांच्या पाठपुराव्याने "सुरक्षित, सोयीस्कर आणि आधुनिक प्रवासा करीत पनवेलला मिळाल्या नवीन बसेस. लोकांच्या सेवेसाठी वाहतुकीतली नवी पायरी प्रगतीच्या दिशेने आणखी एक पाऊल आज पडले पनवेलला मिळाल्या अत्याधुनिक बसेस ज्यामध्ये आवश्यकता प्रवाशांसाठी सुख सोयी उपलब्ध आहेत" आज पनवेल एस.टी. बस स्थानक येथे नवीन बसेसचे लोकार्पण पनवेल महानगरपालिकेचे मा. विरोधी पक्षनेते श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा. नगरसेवक श्री.गणेशजी कडू, मा. नगरसेविका सौ.प्रीती जॉर्ज, मा.नगरसेविका सौ.सारिका भगत,परिवहन विभागीय वाहतूक अधिकारी श्री.अमित गिरमे, वाहतूक अधिकारी श्री ज्ञानेश्वर म्हात्रे, पनवेल आगार व्यवस्थापक सौ.अश्विनी फाळके, श्री संजय पाटील आणि आजारातील विभागीय कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.




# पालखेड विद्यालयात गुणवंतांना पन्नास हजारांची बक्षीस

## न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड विद्यालयात मेळाव्यात मान्यवरांच्या हस्ते वितरण

दैनिक युवक आधार
नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी
निफाड तालुक्यातील पालखेड येथील महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात विद्यार्थी व पालक मेळावा संपन्न झाला.याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे,पालखेडचे भूमिपुत्र दानशूर व्यक्तिमत्व श्रावण हिरे, विनायक खैरे,स्कूल कमिटी सदस्य ज्ञानेश्वर जाधव,माजी मुख्याध्यापक दत्ताराम थेटे,पालखेड ग्रामपालिकेचे सदस्य योगेश होलगडे,राजेंद्र आहेर आदी होते.यावेळी दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यालयाच्या प्रगतीचा आलेख,यशस्वी वाटचाल, विद्यार्थ्यांची प्रगती याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. यानंतर पालकांनी अपेक्षा,पाल्याच्या गुणवत्ता वाढीसाठी करावयाचे प्रयत्न याबाबत चर्चा केली. याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक




शेळके, मंगेश कागदे,संदीप आहेर,सुनंदा दुर्धवळे यांनी शंकानिरसन केले.यावेळी पालक शिक्षक संघ,शालेय व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली.शिक्षक पालक संघाच्या अध्यक्षपदी विजय आहेर,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सतीश थेटे यांची तसेच सर्व सदस्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.याप्रसंगी नवनियुक्त पदाधिकारी व सदस्यांना गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी इयत्ता दहावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांना दानशूर व्यक्तिमत्व श्रावण पुंजाजी हिरे यांनी विद्यालयात आणि केंद्रात प्रथम आलेली विद्यार्थिनी कु.भक्ती विक्रम छाजेड १५००१/-कु.सृष्टी उत्तम नरुडे १०००१/-. (ओपन,ओबीसी प्रथम ) कु. रोहन ज्ञानेश्वर हिरे १०००१/-( नवबौद्ध प्रथम) कु.प्रियंका अरविंद पवार १०००१/-( एस. सी,एन. टी, एस. टी प्रथम)तसेच गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये मयूर आहेर,सुधीर सुरासे,प्रतिज्ञा थेटे,गौरी आहेर, यांनाही प्रत्येकी रोख रक्कम २००१/- रुपये देण्यात आले. तसेच कै. दिनकरराव शंकरराव खैरे यांच्या स्मरणार्थ कैलासराव आणि विनायकराव दिनकर खैरे यांचेकडून केंद्रात महाविद्यालयात प्रथम आलेली भक्ती विक्रम छाजेड १५०१/- द्वितीय सृष्टी सचिन नरुडे १००१/- तृतीय मयूर अनिल आहेर ५०१/-याप्रमाणे रोख रक्कम आणि पारितोषिक देवून सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी शिक्षक- शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांसह पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.सूत्रसंचालन सावन जाधव यांनी तर आभार दत्तात्रय पगार यांनी केले.

# वैनतेय विद्यामंदिरात 'सापांच्या दुनियेची सफर

## नागपंचमी निमित्त सापांबद्दल गैरसमज दूर करून जनजागृती

दैनिक युवक आधार
नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी
निफाड- सापांची केवळ भीतीपोटी मोठ्या प्रमाणावर हत्या केली जाते. सापांबद्दल असलेले गैरसमज, अंधश्रद्धा दूर करण्यासाठी वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर निफाड शाळेतील शिक्षक गोरख सानप यांनी नागपंचमीचे औचित्य साधून सापांच्या दुनियेची सफर घडवली.

शिक्षक सानप यांनी सापांच्या विषारी बिनविषारी जाती, सापांचे अन्न, सर्पदंशाची लक्षणे व त्यावर करायचे प्रथमोपचार, वन्यजीव संरक्षक कायदा, सापाचे विष त्याचे प्रकार व उपयोग, जनसामान्यात असलेले गैरसमज व अंधश्रद्धा यावर चित्रमय भित्तिपत्रिका तयार केल्या. या भित्तिपत्रिका प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे यांच्या हस्ते करण्यात आले. साप दिसल्यास कोणती खबरदारी घ्यायची, सर्पदंश झाल्यास प्रथमोपचार कसा करायचा याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. ' सर्पमित्रांची मदत घेवू, सापाला जीवदान देवू' ' साप वाचवा पर्यावरण वाचवा' अशा घोषणांनी विद्यार्थ्यांनी जनजागृती केली.

अन्नधान्याची नासाडी करणा-या उंदीर, घुशींना खाऊन साप अन्नसाखळीतील एक महत्वाचा घटक मानला जातो. नागपंचमीच्या सणाला विद्यार्थ्यांच्या मनात सापांविषयी असलेले गैरसमज दुर करून सापांबद्दल जागरूकता निर्माण करणा-या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, संस्थापक विश्वस्त अड ल.जि. उगांवकर, विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, राजेश सोनी, अड. दिलीप वाघावकर, विश्वास कराड, मधुकर राऊत, प्रभाकर कुयटे, नरेंद्र नांदे, निफाड पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत गायकवाड, विस्तार अधिकारी लता भरसट, केंद्रप्रमुख अनिता आहिरे व पालकांनी कौतुक केले. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी गोरख सानप, किरण खेरनार, संजय जाधव, व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

चौकट
सापांबद्दल असलेले गैरसमज व अंधश्रद्धा अशा.
साप दूध पितो.
साप डूख धरतो.
नाग धनाचे रक्षण करतो.
मांडुळाच्या मदतीने गुप्तधन शोधता येते.
सापाला संगित आवडते, तो गारूड्याच्या बिनीवर डोलतो.
मंत्राने विष उतरते.
साप एका रूपातून दुस-या रूपात जाऊ शकतो.
धामण साप गायीच्या पायाला विळखा घालून दूध पितो.
मंत्राने साप नियंत्रित करता येतो.



फोटो
निफाड : नागपंचमीनिमित्त सापांच्या दुनियेची सफर प्रदर्शनाला भेट देतांना वैनतेय प्राथमिक विद्यामंदिरातील विद्यार्थी समवेत मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे, गोरख सानप, किरण खैरनार, संजय जाधव.

# ज्येष्ठ नागरिकाची सापडलेली बॅग आष्टी आगारातली कर्मचाऱ्यांनी केली परत

दैनिक युवक आधार
बीड आष्टी प्रतिनिधी :-मारुती सत्रे

कोथरूड पुणे येथील निवृत्त .प्रशांत शशिकांत देशमुख यांची रोज लागणारी गोळया औषधे ,कपडे,स्वेटर,आणि विशेष काही जपून ठेवलेले पैसे अशी बॅग प्रवास करत असताना बस मध्ये विसरली असताना आष्टी आगारातील

> यावेळी सदर गृहस्थाच्या चेहऱ्यावरील आनंद गगनात मावेनासा होता.ज्यावेळी बॅग त्यांचे हाती सुपूर्द केली त्यावेळी त्यांनी *आणखीही या जगात देव आहे असे उद्गार काढले.
> यावेळी कार्यशाळा अधीक्षक .के.जी.गव्हाणे आणि आगार प्रमुख श्री. चोथमल साहेब यांनी कर्मचाऱ्यांना त्यांनी दाखवलेल्या इमानदारीबद्दल गौरवौदगार काढले.

कर्मचाऱ्यांनी परत केली. त्याने जपून जपून ठेवलेली एक एक वस्तू त्याच्यासाठी किती किंमतीची असते ... आणि ती एक एक वस्तू एका जागी गोळा करून ठेवलेली संपूर्ण पिशवी हरवते. अफाट वेदना कष्ट त्या वृद्धाला न पेलवणारे ....

अशावेळी त्याला जेव्हा कुठूनतरी फोन जातो तुमची पिशवी मिळाली. किती आनंद ..काय सांगावा .....याचा आज प्रत्यक्ष प्रत्यय आला. कोथरूड पुणे येथील निवृत्त श्री.प्रशांत शशिकांत देशमुख यांची रोज लागणारी गोळया औषधे



,कपडे,स्वेटर,आणि विशेष काही जपून ठेवलेले पैसे अशी बॅग आम्हाला आज मिळून आली.

आष्टी आगाराचा नेहमीच प्रयत्न असतो ज्याची वस्तू त्याला मिळावी. पण आजची बॅग खूप तातडीने सादर गृहस्थाला मिळाली पाहिजे असे .कार्यशाळा अधीक्षक .केशवराव गव्हाणे यांनी आम्हाला सूचना केली. डी. डी.गर्जे ,.ठाकरे आर. के.,गणेश वारंगुळे ,.बाळासाहेब थोरवे उपसरपंच पुंडी,रंगनाथ लिंगे या सर्वांनी सादर व्यक्तीचा मोबाईल क्रमांक मिळवण्याचा अथक प्रयत्न केला. जुन्या डायरीतून नातेवाईक ,हॉस्पिटल यांना कॉल करून शेवटी यश मिळाले आणि सदर व्यक्तींपर्यंत मेसेज पोहचला की आपली बॅग मिळाली आहे.

# नागपंचमी आणि नाभिक समाज...

## श्रावण महिना म्हणजे सणांचा महिना.आणि

## श्रावणातील पहिला सण 'नागपंचमी'चा

आपल्या कुटुंबाची नागभयापासून सदासर्वकाळ मुक्तता व्हावी व नागदेवतेचा कृपाशीर्वाद घरातील सर्वांना प्राप्त व्हावा,यासाठी प्रतिवर्षी श्रावण शुक्ल पक्ष पंचमीला म्हणजेच नागपंचमीला महाराष्ट्रात नाग देवतेचे घरोघरी पूजन केले जाते.या दिवशी घरातील स्त्रिया नवीन अलंकार, नवीन वस्त्र परिधान करून मनोभावे नागाची पूजा करतात.घरामधे नागाची प्रतिमा अथवा जिवती (प्रतिमा) लाऊन महिनाभर पूजा अर्चा केली जाते.नागपंचमीचा सण हा विशेष करून स्त्रियांचा सण.पुराणातील विविध प्रचलित कथांनुसार हा सण राज्यभर विविध भागात वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो.परंतु मुख्य उद्देश मात्र एकच असतो आणि तो म्हणजे नागभयापासून मुक्तता आणि नागाचे संवर्धन. या दिवशी महिला काही तळत,भाजत अथवा कापत नाहीत. यामागे मुख्य हेतू हाच असतो की, घरातील गृहिणीला किमान या निमित्ताने एक दिवस तरी आराम मिळावा.तसेच अनवधानाने नागाला काही ईजा होऊ नये म्हणून शेतकरी देखील आपली सर्व शेतातील कामे बंद ठेवतात. थोडक्यात सांगायचे झाले तर आज एकविसाव्या शतकात देखील राज्यभर हा सण मोठ्या आनंदाने आणि भक्तिभावाने साजरा केला जातो.आपल्या राज्यातील नाभिक समाजासाठी या सणाचे अनन्यसाधारण महत्व आहे. नाभिक समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी सेनाजी महाराज यांच्या पुण्यतिथी प्रमाणेच नागपंचमीचा सण देखील नाभिक बांधव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करतात.नागपंचमीचा सण आणि सकल नाभिक समाजाचे एक अतूट नातेच बनले आहे. नाभिक पुराण या अतिप्राचीन ग्रंथानुसार नाभिक म्हणजेच शेषनाग, न्हावी हा शेषनागाचाच अवतार होय. या ग्रंथामधील कथेनुसार नाभिकाची उत्पत्ती म्हणजेच न्हाव्याची उत्पत्ती ही भगवान शंकराच्या नाभीतून झालेली आहे. जेंव्हा सृष्टीची निर्मिती झाली तेंव्हा पृथ्वीवर महाप्रलय होता. सर्वत्र पाणीच पाणी आणि अंधार पसरलेला होता. तेव्हा भगवान शंकराने आपला तिसरा डोळा उघडून तो प्रलय थांबवला.यानंतर पृथ्वीवर समुद्र, पर्वत व नद्यांची निर्मिती केली. तर आकाशात चंद्र, सूर्य, तारे आणि नक्षत्रांची स्थापना केली.भगवान शंकराच्या कृपेने विष्णूच्या नाभीतून ब्राह्मणाची उत्पत्ती झाली.तो चतुर्मुख होता.त्या ब्राह्मणाला शंकराने सृष्टीची निर्मिती करण्यास सांगितले.तेव्हा विष्णूने शंकराला सांगितले, की ब्राह्मणाचे मुंजबंधन झाल्याशिवाय त्यास ब्राह्मणत्व प्राप्त होणार नाही. मुंजसाठी जानवे व शिखाची गरज होती.शिखाचे काम कोणी करावे, हा प्रश्न निर्माण झाला.शिखा प्राप्त होण्यासाठी नाभिकाची निर्मिती आवश्यक होती.तेव्हा भगवान शंकराने आपल्या कंठातील शेषाला स्वतःच्या नाभीकमलातून जन्म घेण्यास सांगितले, सुरुवातीला शेषाने भगवंतापासून दूर व्हावे लागेल म्हणून विरोध केला आणि भगवान शंकराला विचारले की, *जन्मानंतर मला कशाची प्राप्ती होईल?'* यावर भगवान शंकर उत्तरले, तुला सर्व कामात मोठा मान सन्मान प्राप्त होईल.तुझ्याशिवाय ब्राह्मणाला ब्राह्मणत्व प्राप्त होणार नाही. तु सर्वांचा आवडता होशील व श्रावण महिन्यातील नागपंचमीस तुझे घराघरात पूजन केले जाईल.स्त्रियांचा तू भाऊ होशील.तुझ्या वंशात उत्पन्न झालेल्या सर्वांना मान देतील.भगवान शंकर आणि विष्णूच्या या विनंती नुसार अखेर शेषाने शंकराच्या नाभीतून मनुष्यरूपाने जन्म घेतला.नाभीच्या कुंडलीनितून जन्म घेतल्यामुळे त्याचे गोत्र कौंडील्य झाले.आणि शेषाचाच अवतार असलेल्या भगवान शंकराच्या नाभीतुन जन्म घेतल्यामुळे शेषनागास मनुष्य अवतारात नाभिक हे नाव प्राप्त झाले. म्हणूनच शेषनागाला नाभीकाचा वंशज म्हणतात. नाभिकाचा जन्म तर झाला पण त्याला ब्रह्मदेवाची मुंज करण्यासाठी क्षुरा म्हणजेच हत्यार नको का? तेंव्हा भगवान शंकराने आपल्या अंतःकरणातील पाचव्या सूक्ष्म वेदाला पाचारण केले व त्यापासून तात्काळ मंत्रमय धूरा तयार केला. हे झाले नाभिकाचे हत्यार.. त्यानंतर याच हत्याराच्या साहाय्याने नाभीकाने ब्रम्हाची शेंडी राखली आणि त्यानंतर ब्रह्मदेवाचे मौजिबंधन संपन्न झाले. अशा रीतीने नाभिक पुराण या ग्रंथानुसार शेषनाग हा सकल नाभिक समाजाचा पूर्वज ठरतो. म्हणूनच या नागराजाचा नागपंचमी हा सण राज्यातीलच नव्हे तर देशभरातील नाभिक समाज बांधवांसाठी पवित्र मानला जातो. याच कारणामुळे सर्व नाभिक समाज या दिवशी आपला पारंपरिक व्यवसाय असलेले सलूनचे दुकानं आणि दैनंदिन व्यवहार बंद ठेवून नागराजाची भक्ती भावाने पूजा करून नैवद्य अर्पण करतात आणि आपल्या पूर्वजाचे स्मरण करून आनंद साजरा करतात.

**श्री.रमेश सुरशे**
**दैनिक युवक आधार (मराठवाडा प्रतिनिधी) छत्रपती संभाजीनगर**

# रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्गाविरोधात कोकणकरांची महासभा! दादर येथे संपन्न




**दैनिक युवक आधार : किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

मुंबई–गोवा महामार्ग जनआक्रोश समितीचा एकजुटीचा निर्धार – रखडलेल्या कामांवर कारवाईची जोरदार मागणी रखडलेल्या मुंबई–गोवा महामार्गाविरोधात कोकणकरांची महासभा! गावसकर सभागृह, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर (पूर्व) येते झाली *सभागृहात उपस्थित असलेले सर्व मान्यवर, ज्येष्ठ नागरिक, समाजसेवी मित्र, आणि कोकणप्रेमी बंधू–भगिनींनो*, आज आपण सर्वजण एकत्र आलो आहोत एका *अत्यंत महत्त्वाच्या विषयावर आवाज उठवण्यासाठी* – तो म्हणजे मुंबई–गोवा महामार्ग (राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६) याच्या रखडलेल्या कामावर! ही केवळ एक महामार्गाची समस्या नाही – ही कोकणच्या लोकांच्या रोजच्या जगण्याशी निगडित असलेली व्यथा आहे. *आपल्या कोकणातल्या रस्त्याच्या प्रश्नासाठी , जो फक्त रस्ता नाही आपल्या विकासाचा मार्ग* आहे या महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम गेल्या १७ वर्षांपासून रखडलेले आहे. हजारो कोकणवासीयांचे, प्रवाशांचे, पर्यटकांचे आणि वाहनचालकांचे आयुष्य या रखडलेल्या कामामुळे संकटात सापडले आहे.अनेक वेळा घोषणा होतात , भुमिपुजन होते, तारखा जाहिर होतात, पण काम मात्र अत्यंत संथ गतीने चालते याचा थेट फटका कोकणातील सामान्य जनतेला बसतोय –प्रवासात अंडथळे , अपघात ,वाहतुकीस खोळंबले, आणि कोकणाच्या विकासाला बसलेल खीळ ! अपूर्ण रस्तेमुळे दरवर्षी शेकडो अपघात, मृत्यू व जखमींची संख्या वाढते आहे. वाहनचालकांना अनेक तास ट्रॅफिक जाममध्ये अडकावे लागते. त्यामुळे आर्थिक घसरण, व्यापाराची अडथळलेली वाटचाल आणि कोकणातील पर्यटनावरही परिणाम होतो आहे आणि या सर्वामागे आहे प्रशासनाची उदासीनता व काम करणाऱ्या कंपन्यांचा हलगर्जीपणा. आमचं *हे आंदोलन केवळ विरोधासाठी नाही – हा आमचा हक्क आहे, ही आमची जबाबदारी आहे.* आम्ही प्रशासनाला, शासनाला आणि जबाबदार कंत्राटदारांना स्पष्ट सांगू इच्छितो – काम वेळेत, दर्जेदार आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण झालंच पाहिजे. कोकण ही केवळ पर्यटनाची जागा नाही, ही आमच्या जगण्याची जागा आहे. रस्ते वेळेवर होत नसतील, तर आरोग्यसेवा, शिक्षण, उद्योगधंदे – सगळंच प्रभावित होतं. म्हणूनच ही महासभा म्हणजे आपल्या लोकशाहीतील हक्काच्या आवाजाचं प्रतीक आहे. आपण सर्वांनी *एकत्र राहून आवाज उठवला, तर कोणतीही ताकद आपल्या मागण्यांकडे दुर्लक्ष करू शकत नाही.* आपण कोकणवासी ही समस्या *निराशेने नव्हे तर निर्धाराने हाताळणार आहोत*. आज या महासभेमधून आपण प्रशासनाला, मंत्रालयाला आणि संबंधित खात्यांना एकच संदेश देणार आहोत – "हे काम तुम्ही पूर्ण करा, नाहीतर जनतेचा रोष ओढवून घ्या!" आमच्या मागण्या सामान्य आहेत रखडलेल्या कामांसाठी जबाबदार कंत्राटदारांवर कारवाई करावी. रस्त्याचे काम निश्चित कालमर्यादेत पूर्ण व्हावे. कामाच्या दर्जावर स्वतंत्र तांत्रिक तपासणी होणे आवश्यक आहे. प्रवाशांसाठी सुरक्षित मार्ग, वैद्यकीय व्यवस्था, व अपघात नियंत्रणासाठी तातडी उपाययोजना कराव्यात. कोकण ही आपली मायभूमी आहे, आणि *तिच्या प्रगतीसाठी आपला आवाज बुलंद करणे ही आपली जबाबदारी आहे. या महामार्गाच्या दिरंगाईमुळे आपल्या व्यवसायांवर, पर्यटनावर आणि रोजच्या प्रवासावर होणारा परिणाम आपण किती काळ सहन करणार? आता वेळ आहे एकत्र येण्याची, आपल्या हक्कांसाठी लढण्याची आणि कोकणाच्या समृद्ध भविष्यासाठी पुढाकार घेण्याची!* ही महासभा म्हणजे केवळ एक कार्यक्रम नाही – ही एक जनआंदोलनाची सुरुवात आहे. आजच्या या व्यासपीठावरून आपण एकमेकांना बळ देऊया, एकत्र येऊया आणि या महामार्गाच्या पूर्णतेसाठी शेवटपर्यंत लढा देऊया. "कोकणच्या रस्त्याला रस्ता मिळेपर्यंत झगडूया!" जय कोकण, जय महाराष्ट्र!

# रा.जि प. कोळवे शाळेचा सुवर्ण महोत्सवी दिन थाटामाटात साजरा

दैनिक युवक आधार
तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी

दिनांक २८ जुलै २०२५ रोजी पेण तालुक्यातील रा.जि.प. कोळवे शाळेची स्थापना २८ जुलै १९७५ रोजी झाली आणि दिनांक २८ जुलै २०२५ रोजी या शाळेचे ५० सावे सुवर्ण महोत्सवी वर्ष किंवा अर्धशतक या निमित्ताने शाळेमध्ये विविध कार्यक्रम, उत्सव आणि समारंभाचे आयोजन केले जाते. ५० वर्षाच्या प्रवासाचा गौरव करणे ,माजी विद्यार्थी आणि शिक्षकांना एकत्र आणणे आणि शाळेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देणे असा या सोहळ्याचा उद्देश असतो. यावेळी शाळेचे माजी विद्यार्थी या सोहळ्याला आवर्जून उपस्थित राहतात .शाळेच्या ५० वर्षाच्या प्रवासातील शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा आढावा घेतला जातो.

"हि आवडते मज मनापासूनी शाळा ! लाविते लळा ही जसा माऊली बाळा!!

अशी हि कोळवे येथील शाळा गेली ५ दशके अभिमानाने उभी आहे विद्यार्थी घडविण्याचे पवित्र काम करत आहे.शाळा हि एक जीवनातील महत्त्वाचा भाग आहे.सुंद्रर भविष्य घडविण्यात शाळेचा सहभाग हा महत्वपूर्ण आहे.शाळेतील , शिक्षकांनी दिलेले संस्कार,शिक्षण,खेळ, मित्र, आणि शिक्षकांसोबतचे नाते हे मोठे झालो तरी मनात घर करून रहातात. शाळेतील शिक्षक हे प्रेरणास्थान व मार्गदर्शक असतात.

दिनांक २८ जुलै रोजी राजिप कोळवे शाळेला ५० वर्षे पूर्ण झाली या वर्धापनदिना निमित्ताने आयोजित कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ.जोस्ना म्हात्रे ,उपाध्यक्ष व प्रहार अपंग क्रांती संघटना पेण, तालुका उपाध्यक्ष राहुल म्हात्रे, शिक्षण प्रेमी वडखळ ग्रामपंचायत सदस्य श्री रविंद्र म्हात्रे, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री मोरेश्वर म्हात्रे ,वडखळ ग्रामपंचायत सदस्या सौ जयश्री म्हात्रे, शाळेचे मुख्याध्यापक श्री अंकुश पाटील गुरुजी , अंगणवाडी मदतनीस सौ जयवंती म्हात्रे, शाळा



व्यवस्थापन समिती सर्व सभासद आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त या शाळेत ज्ञानार्जन केलेले माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेविषयी बोलताना आपल्या अविस्मरणीय क्षणांना उजाळा दिला.शाळेतील शिक्षक व त्यांचे नाते, शिक्षकांची विद्यार्थ्यांसोबत असलेली वागणूक,या शाळेला सर्व चांगले शिक्षक लाभले आणि हि शाळा जशी आहे अगदी तशीच रहावी, गावातील पालकांनी आपल्या मुलांना याच शाळेत प्रवेश घ्यावा, अशी विनंती माजी विद्यार्थी , शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकांनी पालकांना आणि ग्रामस्थांना केली. कारण याच शाळेतील विद्यार्थी आज उच्चस्थ पदावर कार्यरत आहेत. डॉक्टर, वकील,शिक्षक, शासकीय अधिकारी , इंजिनिअर अशा पदांवर कार्यरत असून नावलौकिक कमावत आहेत..

असे हे सरस्वतीचे मंदिर, जीथे अक्षरांची ओळख झाली, आईचा लळा लावत असलेली शाळा विसरू नका ,तर आम्ही हि याच शाळेत शिकलो आपणही याच शाळेत ज्ञानाचे धडे घ्यावेत असा संदेश माजी विद्यार्थ्यांकडून देण्यात आला.

शाळेचा ५० सावा वर्धापन दिन हा एक महत्त्वाचा आणि उत्साहाचा दिवस असतो. जो शाळेच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा असतो. यासाठी शाळेच्या पुढील वाटचालीस साठी शुभेच्छा दिल्या. भविष्यातील वाटचालीसाठी दिशादर्शक ठरणारे नियोजनाचा आढावा घेतला. आणि सुंदररित्या हा कार्यक्रम संपन्न झाला.

# वारणी येथे पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त वृक्षारोपण

दैनिक युवक आधार
शिरूर कासार (प्रतिनिधी)

शिरुर कासार तालुक्यातील वारणी येथे महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त पंकजाताई समर्थक इंजिनिअर एम.एन.बडे यांनी वृक्षारोपनाचा कार्यक्रम आयोजीत केला होता. पंकजाताई यांच्याकडे पर्यावरण खाते असल्यामुळे त्यांच्या खात्याला साजेसा पर्यावरण पूरक उपक्रम आयोजित केला होता.

यावेळी वारणी गावचे सरपंच ज्ञानदेव आण्णा केदार यांच्या हस्ते व पंकजा ताई समर्थक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत वृक्ष लगवड करण्यात आली. शेतीच्या, रस्त्या कडेला व बांधावर चिंच, जांबुळ, आवळा , आंबा, पेरू व नारळ या झाडाची लागवड इंजि.एम.एन.बडे यांनी केली आहे. यावेळी कार्यक्रमाला ग्रामपंचायतचे केशवा नाना केदार, शिवनाथ बापू केदार, स्वस्त धान्य दुकानदार राजाभाऊ केदार, उपसरपंच शिवनाथ केदार, ग्रा. पंचायत सदस्य सुनील केदार व रामनाथ बडे, अर्शद शेख व विद्यार्थी उपस्तीत होते.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## उद्धव ठाकरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळा निमित्त ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप



दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः– जितेंद्र खोडे

राळेगावः–शिवसेना पक्ष प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राळेगाव शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे उपजिल्हा प्रमुख विनोद काकडे यांच्या नेतृत्वात ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णांना फळ वाटप करण्यात आले. यावेळेस प्रमुख उपस्थित उपजिल्हा प्रमुख विनोद काकडे, तालुका प्रमुख विजय पाटील, शहर प्रमुख इम्रान पठाण, उपतालुका प्रमुख प्रशांत वारेकर, महिला आघाडीच्या शहर प्रमुख पार्वता मुखरे, युवा सेना तालुका प्रमुख वृषभ दरोडे, उप शहर प्रमुख दिपक येवले, जीवन रामगडे, सुनील सावरकर, शहर संघटक योगेश मलोंढे, अमोल राऊत, अखिल निखाडे, शाखा प्रमुख अंकुश गेडाम, किशोर कापसे, शंकर गायधने, गौरव ठाकरे, अनिस शेख, हेमंत वाभीटकर, सुरेंद्र भटकर, वैभव लोणार, उमेश राठोड, गजानन केराम, मनोज वाकूलकर, प्रणय मुडे, सुरज कोटरंगे, पंकज ढाले, विशाल वरुडकर, महादेरावजी मुखरे, असे असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

## खारघर परिसरात दारूबंदी करण्याबाबत आ. प्रशांत ठाकूर यांची जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याशी चर्चा

दैनिक युवक आधार
अलिबाग (प्रतिनिधी)
आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली खारघर मधील राजकीय पक्ष पदाधिकारी, संघर्ष समिती कार्यकर्ते यांनी रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांची सोमवारी (दि.२८) जिल्हाधिकारी कार्यालयात भेट घेऊन त्यांच्याशी खारघर येथे कायमस्वरूपी दारूबंदी करण्याबाबत चर्चा केली. जिल्हाधिकारी यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्यासह राज्य उत्पादन शुल्क अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये खारघर मधील कायमस्वरूपी दारूबंदी घोषित करण्यासंदर्भात करावयाची शासकीय प्रशासकीय मतदान प्रक्रिया याबाबत चर्चा करण्यात आली. करण्याबाबत राज्य शुल्क अधिकारी व जिल्हाधिकारी रायगड यांनी उभी बाटली आडवी बाटली निवडणूक प्रक्रिया कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. ज्या ठिकाणी निवडणूक घायची आहे तेथून २५ टक्के मतदारांचे निवडणुकीसाठी अर्ज केल्यास मतदान घेतले जाईल. विधानसभेची मतदार यादी या प्रक्रियेसाठी वापरण्यात येईल. निवडणूक प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे राबवण्यात येईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. खारघर संघर्ष समितीला दारूबंदीसाठी व



निवडणूक प्रक्रियेसाठी लागणारे सर्व प्रकारे सहकार्य करण्याचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. खारघरमध्ये संपूर्ण दारूबंदी करण्याबाबत विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडून या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधले होते. तसेच दारूबंदीसाठी योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे. आणि या संदर्भातील प्रक्रिया करण्यासाठी शासनाने पाठिंबा द्यावा, अशी मागणी लक्षवेधी सूचनेतून केली होती. खारघर परिसरात दारूबंदी करण्याबाबत विहित प्रक्रियेनुसार निवेदन प्राप्त झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आश्वासित केले होते. या संदर्भात पुढील प्रक्रिया राबवण्यासाठी आज जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन खारघरमध्ये संपूर्ण दारूबंदी करण्यासाठी मतदानाबाबत चर्चा केली. खारघरमधील तीन प्रभागांमधील २५ टक्के मतदारांनी संपूर्ण दारूबंदीसाठी अर्ज दिल्यास मतदान घेत येईल असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले आहे. त्यानुसार आता पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

## एसबीआय लाइफ इन्शुरन्स यवतमाळ यांचे तर्फे हरिष गडदे यांची मॅनेजिंग डायरेक्टर क्लबमध्ये निवड




दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः –जितेंद्र खोडे
राळेगावः–एसबीआय लाइफ इन्शुरन्स को–ऑपरेटिव लिमिटेडच्या महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वोच्च "मॅनेजिंग डायरेक्टर क्लब" पदी हरीश विश्वंभर गडदे यांची निवड झाल्याबद्दल एसबीआय लाइफ इन्शुरन्स, यवतमाळ शाखेच्यावतीने दिनांक २६ जुलै २०२५ रोजी राळेगाव येथील त्रिमूर्ती हॉल येथे सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात एसबीआय नागपूर विभागाचे डेप्युटी रिजनल मॅनेजर सुमित पाटील आणि यवतमाळ शाखेचे सीबीएम मनोज राखे यांच्या प्रमुख उपस्थितीत हरीश गडदे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.
कार्यक्रमात उपस्थित एसबीआय ग्राहकांना सुमित पाटील आणि मनोज राखे यांनी मार्गदर्शन करताना एसबीआय लाइफमध्ये गुंतवणुकीचे फायदे स्पष्ट केले. त्यांनी उपस्थितांना विश्वास व सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून एसबीआय लाइफ इन्शुरन्समध्येच गुंतवणूक करण्याचे आवाहन केले.या प्रसंगी तालुक्यातील अनेक एसबीआय ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारत–पाक बॉर्डरच्या राज्याचा पाद्यपूजन सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न

दैनिक युवक आधार
मुंबई,(केतन भोज); मुंबई येथील भारतीय नौदलाच्या बेस शेजारी, कुर्ला एल.बी.एस. मार्गावरील श्री.सिद्धिविनायक गणेश चित्र शाळेत भारत–पाकच्या बॉर्डरच्या राजाची मूर्ती साकारण्यात येत आहे. भारत–पाक पुंछ सीमेवर विराजमान होणाऱ्या या गणेशाची मूर्ती दरवर्षी मुंबईतून काश्मीरला नेली जाते. यंदाचे हे मूर्तीचे सोळावे वर्ष आहे. भारत आणि पाकिस्तानच्या सीमेवरील पुंछ जिल्ह्यात विराजमान होणाऱ्या राजाचा पाद्यपूजन सोहळा रविवारी दि. २७ जुलै २०२५ रोजी मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. भारत–पाक बॉर्डरच्या राजाचा पाद्यपूजन सोहळा पार पडला त्यावेळी ईशरदिदी (मानवाधिकार कार्यकर्ता), छत्रपती आवटेदादा, मंगेश मस्तुद, प्रमोद चव्हाण, बाळू राऊत, अजित घगवे, विनीत पटेल, जगदीश बुछडा, अनुप सोनी, किरण भड, सुहेल तसेच प्रोग्रेसिव्ह नेशन एनजीओ चे कार्यकर्ते उपस्थित होते. भारत–पाक सीमेवर पुंछ येथील पुलस्त नदीच्या तटावर मानव अधिकार कार्यकर्त्या व प्राचीन शिव दुर्गा भैरव मंदीर ट्रस्ट उपाध्यक्षा ईशरदीदी तसेच समाजसेवक व



शिवनेरी सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष छत्रपती आवटे व प्रोग्रेसिव्ह नेशन एनजीओ कार्यकर्ते यांच्या संयुक्त विद्यमाने या गणेशोत्सवाचे आयोजन केले जाते. या उत्सवात विराजमान होणाऱ्या गणेशाला भारत–पाक बॉर्डरचा राजा म्हणून संबोधले जाते.भारतीय जवानांना देखील गणेशोत्सव साजरा करता यावा या उद्देशाने मुंबई ही आपली आर्थिक राजधानी आहे आणि मुंबई मध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहतात त्यामुळे मुंबईतून सर्वांचे प्रेम आशिर्वाद घेऊन मानव अधिकार कार्यकर्त्या व प्राचीन शिव दुर्गा भैरव मंदीर ट्रस्ट उपाध्यक्षा ईशरदीदी जम्मू आणि काश्मीर येथील पुंछ या ठिकाणी गणेशाची मूर्ती घेऊन जातात. जम्मू काश्मीर येथे भारतीय जवान मोठ्या हर्ष उल्हासात गणरायाचे स्वागत करतात व जम्मू आणि काश्मीर येथील पुंछ या ठिकाणी गणरायाला विराजमान करण्याचे हे अखंडीत सोळावे वर्ष आहे.

## इंदापूर रोटरी क्लबकडून दहावीतील प्रियदर्शनीच्या विद्यार्थ्यांना आयडियल स्टडी ॲप मोफत




दैनिक युवक आधार
सणसर :– विकास क्षत्रिय
रोटरी क्लब ऑफ इंदापूर सेंट्रल कडून इंदापूर मधील प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूल येथील दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना आयडियल स्टडी ऍप चे मोफत वितरण माननीय श्री.प्रदीप दादा गारटकर(पुणे जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस) तसेच माननीय श्री वसंत माळुंसकर सर–को डायरेक्टर ई लर्निंग अप,माननीय श्री ज्ञानदेव डोंबाळे सर अध्यक्ष इंदापूर रोटरी क्लब,यांच्या हस्ते करण्यात आले.या एका स्टडी ची किंमत पंधराशे रुपये इतकी आहे.पण हे अप रोटरी क्लब इंदापूर सेंट्रलकडून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत देण्यात आले आहे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष माननीय श्री. प्रदीप दादा गारटकर साहेब होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गारटकर साहेबांनी शाळेच्या जर काही अडचणी असल्यास ते अडचणी सोडवण्यास पूर्णतः मदत केली जाईल असे आश्वासन दिले.संस्थेचे चेअरमन माननीय श्री नायर सर यांच्या मार्गदर्शनाखाली व संस्थेचे व्हाईस चेअरमन माननीय श्री इम्रान शेख सर अध्यक्षतेखाली आज शालेय प्रांगणामध्ये हा कार्यक्रम पार पडला. यावेळी सौ मंदाकिनी डोंबाळे मॅडम,सुधीर शेंडे सर,आप्पासाहेब बंडगर सर,मोरेश्वर कोकरे सर ,महादेव दादा काळे सर,राजाराम सागर सर,तात्यासाहेब वाघमारे सर,चंद्रकांत तरंगे सर,नायकुडे सर,प्राचार्य श्री सुधीर भिसे सर उपस्थित होते. प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य श्री सुधीर भिसे सर यांनी इंदापूर सेंट्रल रोटरी क्लब यांनी विद्यार्थ्यांना केलेल्या मदतीबद्दल आभार मानले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ.राजश्री महाडिक मॅडम यांनी केले.

## आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या व्हॉट्सॲप ग्रुप मार्फत शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मातोश्री 150 किलो लाडूचे वाटप

दैनिक युवक आधार
मुंबई,(केतन भोज); संपूर्ण महाराष्ट्रातील शिवसैनिक सदस्य असलेला आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या व्हॉट्सअप ग्रुप मार्फत ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण करत २६ सामाजिक उपक्रम राबविले गेले आहेत.तसेच २७ वा उपक्रम दर वर्षाप्रमाणे शिवसेना पक्षप्रमुख महाराष्ट्राचे राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या ६५ व्या वाढदिवसा निमित्त महाराष्ट्रातून येणाऱ्या तमाम शिवसैनिकांसाठी मातोश्री बंगला,बांद्रा येथे १५० किलो लाडू वाटप करण्यात आले.या लाडू वाटप स्टॉलवर आमदार,खासदार,नगरसेवक यांनी भेट देऊन त्यांच्या हस्ते वाटप करून त्यांनी देखील आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या ग्रुपची तोंडभरून कौतुक केले.या ग्रुप मधील कोल्हापूर,सोलापूर रत्नागिरी,भंडारा,नाशिक या विविध भागातील या ग्रुपचे सदस्य यांनी सकाळ पासून मेहनत घेऊन हा कार्यक्रम पार करण्यास सहकार्य केले. या ग्रुपचे संस्थापक,संचालक संतोष पाटील,संचालक महेंद्र गुरव,अध्यक्ष सुरेश वाडकर तसेच भालचंद्र उकिर्डे,लवेश म्हात्रे,रंजीत नरवणकर,लिलाधर भोईर,दिलीप गावडे,जितेंद्र पाभरेकर,सुजाता धारगळकर,वासंती गोताड,अनिल कांबळे,संपदा धोंगडे,सोनिया पाटील,संदीप गुरव,प्रवीण कोरपे,विलास चव्हाण,संतोष झोल,खंडू खोचरे,ईश्वर गुळवी,जयाभाऊ दवंडे,बबन शेळके,ललित कुमार मुथा,सागर पाटील,राकेश देवकुळे,आबा मोहिते,लहू साळुंखे,शांताराम नाईक,अशोक कोळंबकर,अशोक देशमुख,संजय डोर्लेकर,सुनील काप,दिनेश पाटील,संजय पवार, रज्जाक शेख,नामदेव रिंगे,राजेश तिवारी इत्यादी ग्रुप मधील सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.



## भूमिपुत्र संघटनेमार्फत झाला श्रीवर्धनमधील मुलांचा शैक्षणिक सर्वे

दैनिक युवक आधार
श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी – अनिकेत मोहित
श्रीवर्धन म्हणजे देवाने निर्माण केलेली अद्वितीय कलाकृती, आई सोमजाई मंदिर, दक्षिण कशी म्हणून प्रसिद्ध असलेले हरिहरेश्वर, दिवेआगर मधील सुवर्ण गणेश आणि लांबच लांब समुद्र किनारा असेल अशा अनेक पुरातन काळातील कलाकृती आणि निसर्गाच्या सानिध्यात वसलेले आहे, श्रीवर्धन चा शेती, मासेमारी आणि नारळी फोपळीची बाग हा मुख्य व्यवसाय पण काहीपर्षापूर्वी आलेल्या चक्रीवादळा मुळे कित्येकांच्या बागा ओसाड पडल्या, आता सध्या श्रीवर्धन मध्ये पर्यटन व्यवसाय हा मुख्य व्यवसाय म्हणून उदयास आला आहे, समुद्रकिनारा सुशोभीकरण, अनेक ऐतिहासिक वस्तू सुशोभीकरण , रस्ते , जेट्टी अशा श्रीवर्धन मध्ये झालेल्या पर्यटन विकासाचा फायदा पर्यटन व्यावसायिकांना झालेला दिसत आहे, पण श्रीवर्धन मधील १०% लोक ही पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहेत, तालुक्यातील आजुबाजूच्या गावात मात्र वेगळी परिस्थिती पाहायला मिळते, अनेक गावच्या गाव ओसाड पहायला मिळत आहेत तरुण पिढी आपला पारंपरिक शेती व्यवसाय महागाई , शिक्षण आणि इतर रोजगार पर्याय उपलब्ध नसल्यामुळे शहराकडे वळू लागली आहे, काही वर्षांनंतर खेडोपाडी अत्यंत भयावह परिस्थिती निर्माण होणार आहे, भूमिपुत्र श्रीवर्धन या संघटनेने यासाठी श्रीवर्धन एका पोर्टल मार्फत मुलांचा शैक्षणिक सर्वे केला आहे त्यात 350 पेक्षा जास्त मुलांनी आपली शैक्षणिक माहिती आणि असलेला कामाचा अनुभव नमूद केला आहे, मुलांची शैक्षणिक पात्रता पाहता श्रीवर्धन सारख्या ठिकाणी पदव्युत्तर शिक्षण उपलब्ध नाही म्हणून बहुतेक मूल परिस्थितीमुळे शिक्षण सोडून रोजगाराकडे वळत आहेत, आशिया खंडातील सगळ्यात मोठी पोर्ट श्रीवर्धन तालुक्यात दिघी येथे आहे काही वर्षांमध्ये अनेक नामांकित कंपन्या श्रीवर्धन मध्ये आपला व्यवसाय उभारतील ,भविष्यात त्यांना पाहिजे असे शैक्षणिक पात्रता असलेले कारागीर येथे तयार व्हावे म्हणून योग्य मार्गदर्शन शिबिरी राबवणे आणि त्यांना पूरक असे अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे

## वाशिम पोलीस दलाच्या महिला पोलीस नाईक संगीता ढोले यांचा आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत डबल सिल्वर मेडल विजय

दैनिक युवक आधार
उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील
वाशिमः–जिल्ह्याच्या पोलीस दलात कार्यरत असलेल्या महिला पोलीस नाईक संगीता मारोती ढोले. यांनी थायलंडच्या पट्ट्या शहरात दि. 16 जुलै ते 19 जुलै 2025. दरम्यान पार पडलेल्या वर्ल्ड स्ट्रेंथ लिफ्टिंग चॅम्पियनशिप मध्ये दोन रौप्य पदकाची कमाई करत भारत आणि वाशिम पोलीस दलाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर उज्वल केले आहे. महिला पोलीस नाईक संगीता ढोले.यांनी खपलश्रळपस इशपलह झअर्शी आणि डीअसपलसिह या दोन प्रकारांमध्ये आपले नेपून्य सिद्ध करत प्रत्येकी एक रोप्य पदक पटकावले. या भव्य आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विविध देशातील प्रतिभावान खेळाडू सहभागी होते. त्यामध्ये संगीता ढोले. यांचे हे यश वाखाण्याजोगे आहे. वाशिम जिल्हा पोलीस अधीक्षक श्री अनुज तारे. यांच्या कार्यकाळात पोलीस दलामध्ये फक्त कायदा सुव्यवस्था नव्हे तर पोलीस अमल दारांच्या कल्याणासाठी तसेच त्यांच्या वैयक्तिक व शारीरिक विकासासाठी विशेष योजना राबविल्या जात आहेत. पोलीस कल्याण शाखेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा लाभ संगीता ढोले यासह इतर अधिकारी व कर्मचारी यांना मिळत आहे. संगीता ढोले यांनी यापूर्वीही राज्यस्तर व परि क्षत्रिय स्पर्धामध्ये अनेक पदकाची कमाई केली आहे. त्यांच्यातील क्रीडा प्रेम आत्मसिस्त व सातत्य यामुळे त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहच मिळवली आहे. या यशाबद्दल वाशिम जिल्हा पोलीस दलाच्या वतीने पोलीस अधीक्षक अनुज तारे. यांनी त्यांचे विशेष सत्कार करून अभिनंदन केले. त्यांच्या या कामगिरीमुळे वाशिम जिल्ह्याचा महाराष्ट्र पोलीस दलाचा अभिमान उंचावला आहे.



# भाऊ-बाबा प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी येथे भावार्थ रामायण अरण्य कांड ग्रंथ रोज सुरू

दैनिक युवक आधार
पाटोदा (प्रतिनिधी) – श्रीसंत भगवान बाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड, बालेपीर बीड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वर्ष १८ वे.राष्ट्रसंत भगवान बाबा जयंती निमित्त २५ जुलै ते १३ ऑगस्ट पर्यंत रोज नियमित "भावार्थ रामायण 'अरण्य कांड "हा ग्रंथ सुरू केलेला आहे.



रोज रात्री ०८:००ते१०:००या वेळेत ग्रंथाचे अतिशय सुंदर असे अर्थासह वाचन होत आहे. या ग्रंथाचे सुचक ह.भ.प. कचरू महाराज चव्हाण, व ह.भ.प. संतोष महाराज राऊत आहेत. व वाचक ह.भ.प.उत्तम महाराज दोडके, ह.भ.प.दत्तात्रय महाराज बांगर आहेत तरी या ग्रंथाचा श्रवणाचा लाभ परिसरातील भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजन व श्रीसंत भगवान बाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र भाऊ सानप व त्यांचे सर्व सहकारी यांनी केले आहे.

# जिद्द आणि धाडस महत्वाचे - लोकनेते रामशेठ ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी )** प्रत्येक काम हे जिद्द आणि धाडसाने केले तर अशक्य असे काहीच नाही हे कांडपिळे कुटूंबाने दाखवून दिले आहे असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते



रामशेठ ठाकूर यांनी नढाळ येथे अशोक लेलँडच्या वर्कशॉपच्या उद्घाटनावेळी केले. जुन्या मुंबई पुणे हायवेवरील नढाळ येथे नव्याने अशोक लेलँड वाहनांचे आक्स फ्लीटवर्क हे वर्कशॉप सुरु करण्यात आले आहे. अनुप कांडपीळे यांनी सुरु केल्या या वर्कशॉपचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याहस्ते सोमवारी झाले. यावेळी त्यांनी कांडपीळे कुटूंबीयांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांनी ही शुभेच्छा दिल्या तसेच अनुप कांडपीळे यांनी आपल्या शिक्षणाचा शिक्षणाचा वापर पुरेपुर केला असून ते व्यवसायात नफी यशस्वी होतील असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अजय कांडपीळे, तेजस कांडपीळे, मनोहर कांडपिळे, वैभव देशमुख, गौरव कांडपीळे, अविनाश शिंदे, अनुप कांडपीळे यांच्यासह अशोक लेलँडचे अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

# श्रावणाच्या पहिल्या सोमवारी खांदा कॉलनीतील श्रीराम पतसंस्थेकडून शिवभक्तांना अल्पोपहार

## कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर यांची लाभली उपस्थिती

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी) खांदा कॉलनी येथील श्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्ताने पनवेलमधील जागृत देवस्थान असलेल्या खांदेश्वर मंदीरात तब्बल २०० किलो साबुदाणा खिचडी आणि ५०० डझन केळी असा उपवासाचा फराळ वाटप करण्यात आले. लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या फराळ वाटपाचा लाभ सोमवारी सकाळपासून हजारो शिवभक्तांनी घेतला.
श्री नागरी सहकारी पतसंस्था तुर्भे, नवी मुंबईचे अध्यक्ष रामदास पिंगळे, उपाध्यक्ष हनुमंत शेटे आणि खांदा कॉलनी शाखेचे मुख्य सल्लागार म्हणून ओंकारशेठ गावडे काम पहात आहेत. सेक्टर




७ खांदा कॉलनी येथे श्रीराम नागरी पतसंस्था कार्यान्वित आहे. हजारो ठेवीदारांच्या विश्वासावर पतसंस्थेची यशस्वीपणे वाटचाल सुरू आहे. पदाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून श्रावणाच्या पहिल्या सोमवारी आलेल्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्ताने आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. सकाळी ८ वाजल्यापासून सुरू केलेले फराळ वाटप नियोजनबध्द पध्दतीने यशस्वी होण्यासाठी शाखा सल्लागार मांगिलाल चौधरी, अर्चना खंडागळे, शाखा व्यवस्थापक राकेश भैय्ये आंदीनी परिश्रम घेतले. फराळ वाटपाच्या कार्यक्रमाला माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, भीमराव पोवार, महादेव वाघमारे, शिवसेनेचे शहरप्रमुख सदानंद शिर्के, पतसंस्थेचे पदाधिकारी, उपस्थित होते.

# दिव्यांग विद्यार्थ्यांकडून नागपंचमीसाठी आकर्षक मातीचे नाग विक्रीसाठी; नागरिकांना खरेदीचे आवाहन

दैनिक युवक आधार
चिपळूण (प्रतिनिधी)-- :: कोवॅस संचलित जयदीप मोने उद्योग केंद्र आणि जिद्द मतिमंद मुलांची शाळा येथील दिव्यांग विद्यार्थ्यांनी येत्या नागपंचमीच्या पार्श्वभूमीवर आकर्षक मातीचे नाग तयार केले असून हे नाग विक्रीसाठी विविध ठिकाणी उपलब्ध करण्यात आले आहेत. २९ जुलै २०२५ रोजी नागपंचमी साजरी होणार असल्याने विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेऊन ही पारंपरिक प्रतिकृती साकारली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही या शाळेतील विद्यार्थी विविध वस्तू तयार करतात. त्यामध्ये फिनेल, लिक्विड सोप, हँडवॉश, डिशवॉश, ऑफिस फाईल्स, शुभेच्छा कार्ड्स, कागदी फुले, बुके, रांगोळी, उटणे, अगरबत्ती, कापूसवात, आकाशकंदील, मातीच्या पणत्या, राख्या, तिळाचे लाडू, सजावटीच्या वस्तू आणि यंदाचे वैशिष्ट्य ठरलेले मातीचे नाग यांचा समावेश आहे.



नागपंचमी निमित्ताने हे मातीचे नाग अत्यंत स्वस्त दरात विक्रीस उपलब्ध असून नागरिकांनी ही उत्पादने खरेदी करून विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ द्यावे, असे आवाहन उद्योग केंद्राचे व्यवस्थापक प्रशांत कोतळूककर आणि शाळेचे मुख्याध्यापक सुनील शिंदे यांनी केले आहे. हे सर्व मातीचे नाग कोवॅस बिल्डिंग, बहादूरशेख नाका येथील शाळेत विद्यार्थ्यांनी तयार केले आहेत. सदर उत्पादने चिपळूण शहरातील श्रीराम किराणा स्टोअर्स - काविळतली, खरे किराणा स्टोअर्स - रावतळे, चितळे किराणा दुकान - गुरुकुल मागे, रेडीज - प्रांत ऑफिस समोर, महाडीक - अभिषेक हॉटेल शेजारी, शिवदे - दिलखुश चनाभट्टी, कदम - कळंबस्ते नाका, चिपळूण बाजार, जिव्हाळा बाजार, महिला मंडळ - वडनाका आदी ठिकाणी विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. या विद्यार्थ्यांनी दाखवलेली कला, जिद्द आणि आत्मनिर्भरतेचा प्रयत्न समाजासमोर पोहोचवण्यासाठी आणि त्यांच्या हातून साकारलेल्या पर्यावरणस्नेही मातीच्या नागांची खरेदी करून सामाजिक भान जपण्याचे आवाहन कोवॅस संस्थेने केले आहे.

# मा.आ. हंबर्डे यांच्याकडून डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात गोरगरीब रुग्णांसाठी औषधी साठा उपलब्ध



दैनिक युवक आधार
नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री, माझे नेते मा.ना. अजितदादा पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त मा.आ. हंबर्डे यांच्या स्वखर्चाने डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय, वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार घेणाऱ्या गोरगरीब रुग्णांसाठी महाग मोलाचा भव्य औषधी_साठा उपलब्ध करून देण्यात आला यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे, लोकप्रिय आ. .प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या शुभहस्ते जनविश्वास सप्ताह अंतर्गत आणि सामाजिक बांधिलकीतून शासकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता, डॉ. सुधीरजी देशमुख यांच्याकडे सुपूर्द करण्यात येणार आहे. तरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार बंधू उपस्थित होते

## निधन वार्ता* शेषराव आनंदा पालोदकर

**दैनिक युवक आधार**
**सिल्लोड प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**



पालोद (ता. सिल्लोड) शेषराव आनंदा पालोदकर (वय ९०) निवृत्त ग्रामसेवक यांचे सोमवारी ( दि.२७) रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. ते गावातील जुन्या पिढीतील एक ज्येष्ठ नागरिक होते. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी पालोद येथील वैकुंठ धाम स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते रमेश पालोदकर व डॉ. विश्वास पालोदकर यांचे वडील होते.



दैनिक युवक आधार - अलिबाग तालुक्यातील बहिरेश्वर मत्स्य व्यवसाय विकास मच्छिमार सहकारी संस्था धेरंड मर्यादित मच्छिमार संघटनेला शासनाकडून मंजूर अनुदान लवकरात लवकर मिळावे अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली असून या संदर्भात अलिबाग येथे आज मत्स्यव्यवसाय अधिकारी संजय पाटील यांच्यासोबत बैठक पार पडली. यावेळी त्यांच्यासमवेत मच्छिमार संस्थेचे पदाधिकारी आणि मच्छिमार बांधव उपस्थित होते.

# प्रा. संजय पाटील, यांची कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात व्यवस्थापन समिती सदस्यपदी निवड

दैनिक युवक आधार
पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर



माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कै. रमेश खलीपे कनिष्ठ महाविद्यालय पिलीवच्या शाळा व्यवस्थापन संचालकपदी पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते प्रा. संजय पाटील यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीने पिलीव कुसमोड झिंजेवस्ती परिसरातुन पालक वर्गातून आनंद व्यक्त केला जात आहे. प्राध्यापक संजय पाटील यांचा ग्रामस्थांशी सामाजिक कार्यामुळे सतत संपर्क असतो तर अध्यापनाच्या दृष्टिकोनातून अनेक विद्यार्थी वर्गाबरोबरही त्यांचा सतत संपर्क असतो. त्यामुळे संचालक पदी त्यांची निवड योग्य असल्याचे मानले जात आहे. त्यांच्या या निवडीबद्दल लोकप्रतिनिधी ,ग्रामस्थ, विविध संस्था, तरुण मंडळे यांनी त्यांचे दूरध्वनी वरून अभिनंदन करून सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

# भाजपा करंजाडे शहर अध्यक्ष संदेश पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमात संपन्न

दैनिक युवक आधार
कारंजाडे/आण्णासाहेब आहेर
करंजाडे ग्रामपंचायत व भारतीय जनता पार्टी कार्यकारणीच्या माध्यमातून गावदेवी मंदिराच्या टेकडीवर वृक्षारोपण करत, शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करून संध्याकाळी करंजाडे सेक्टर ५ येथे पदाधिकारी,कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर,जनतेच्या उपस्थितीत वाढदिवस संपन्न झाला राष्ट्रीय स्वयंसेवक दलात घडलेले स्वयंसेवक,कार्यक्षम व्यक्तिमत्व,हाती घेतलेल्या कामाला महत्त्व देत ते मार्गी लावण्याचा ध्यास,समाज हिताला प्राधान्य देऊन सामाजिक बांधीलकी जपत,हिंदुत्ववादी आपली ओळख निर्माण करत,भारतीय जनता पार्टीमध्ये करंजाडे शहर अध्यक्षाची जबाबदारी सक्षमपणे स्वीकारून येणाऱ्या पुढील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी चर्चा करून सर्वांनी एकत्र येत करंजाडाच्या विकासासाठी जनतेसोबतही संवाद साधण्याचा त्यांचा दूरदृष्टीकोन उल्लेखनी आहेच,सोबत भारतीय जनता पार्टी व करंजाडे भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या सहयोगातून करंजाडे शहराचा विकास करण्याचा त्यांचा विचार भविष्यात करंजाडे विकासाला चालना देणारा राहीलमदार महेश बालदी,आमदार प्रशांत ठाकूर व आमदार विक्रांतदादा पाटील यांनीही फोन द्वारे शुभेच्छा दिल्या असल्याचे सांगत करंजाडे चे शहर अध्यक्षपदी कारभार पाहताना आमदारांचे मार्गदर्शन,पाठबळ असल्याचे अधोरेखित केले करंजाडे भारतीय जनता पार्टी चे पदाधिकारी व कार्यकर्ते,करंजाडे ग्रामपंचायतचे सरपंच मंगेश शेलार,कर्णा शेलार,युवा महाराष्ट्र प्रतिष्ठान,विक्रांतदादा पाटील प्रतिष्ठान,एकता मित्र मंडळ,श्री शिवशंभो प्रतिष्ठान,उत्तर भारतीय प्रतिष्ठान या सार्वांचे पदाधिकारी,कार्यकर्ते यासह स्थानिक रहिवाशांनीही उपस्थिती दर्शवत संदेश पाटील यांना शुभेच्छा देत अनेक चाहत्यांच्या समवेत आनंदी वातावरणात,स्नेहभोजन करत वाढदिवस आनंदात संपन्न झाला




# महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ मुंबईच्या सदस्यपदी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या यवतमाळ जिल्हा कार्याध्यक्ष आनंद मेश्राम यांची निवड

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:
-जितेंद्र खोडे
यवतमाळ:-विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाची जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी व तालुका कार्यवाह यांची सभा यवतमाळ येथील अभ्यांकर कन्या शाळेत दिनांक २७/०७/२०२५ रोजी दुपारी १:३० वाजता संपन्न झाली. त्या सभेमध्ये तीन विषय चर्चेला ठेवण्यात आले होते. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे, मागील जिल्हा अधिवेशनाचे काही पावती पुस्तके व रक्कम जमा करणे, महाराष्ट्र राज्य शिक्षक महामंडळावर जिल्हा कार्यकारिणीतून एक प्रतिनिधी पाठवणे, या सभेत वरील दोन विषयांवर चर्चा झाल्यानंतर सर्वांच्या सहमतीने विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे यवतमाळ जिल्हा कार्याध्यक्ष, सदैव संघटनेच्या कामात व्यस्त असणारे प्रताप विद्यालय बाभुळगाव येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक आनंद मेश्राम सर यांची महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्या सदस्यपदी एकमताने निवड करण्यात आली.त्या सभेला अध्यक्षपदी प्रांतिक अध्यक्ष अरविंद देशमुख सर उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे माजी प्रांतिक विभागीय कार्यवाह मुरलीधर धनरे सर ,यवतमाळ जिल्हा अध्यक्ष पवन बन सर व जिल्हा कार्यवाह रामकृष्ण जिवतोडे सर उपस्थित होते. या सभेला यवतमाळ जिल्ह्यातील जिल्हा पदाधिकारी आणि जिल्ह्यातील तालुका कार्यवाह आवर्जून उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुलाब सोनेने यांनी केले तर आभार संतोष हेडाऊ सरांनी मानले. ही निवड अत्यंत आनंदाने खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली त्यावेळी अरविंद देशमुख, पवन बन,रामकृष्ण जिवतोडे, मुरलीधर धनरे,आनंद मेश्राम,मनोज जिरापुरे,साहेबराव धात्रक,श्रावनसिंग वडते,श्याम बोडे,श्रिकांत अंदुरकर, गणेश धर्माळे, दिवाकर नरूले, उमाकांत राठोड,उमेद डोंगरे, विठ्ठल परांडे, गुलाब सोनोने, संध्या जिरापुरे, महेश अंदुरे, गंगाधर गेडाम, संतोष हेडाऊ, अरूण गारघाटे,भुपेंद्र देरकर,गजेंद्र काकडे, पंकज राठोड, वैशाली अरविंदराव चौधरी, विलास वाघमारे, गोपाल बुरले, गजानन रासडमगुवार, दत्तात्रय महाकुलकार, धनराज ठेपाले ना. रा. मुरखे, लक्ष्मण मेंद्रान, पंजाब चंद्रवशी, किशोर भगत, सुरेश कन्नाके, दिगांबर बातुलवार, बाळकृष्ण मंदाडे, दिलीप सिर्तावार यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते अशी माहिती विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष श्रावनसिंग वडते सर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.



माध्यमिक शिक्षक संघाचे माजी प्रांतिक विभागीय कार्यवाह मुरलीधर धनरे सर ,यवतमाळ जिल्हा अध्यक्ष पवन बन सर व जिल्हा कार्यवाह रामकृष्ण जिवतोडे सर उपस्थित होते. या

# माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची बोरी येथे सांत्वन भेट

दैनिक युवक आधार
सणसर:- विकास क्षत्रिय
बोरी येथील माजी मंत्री .हर्षवर्धन पाटील यांचे कट्टर समर्थक मानले जाणारे कै. दिनकर शिंदे उर्फ (बापू ) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. १९९५ पासून अपक्ष उमेदवार म्हणून लढत असताना ज्येष्ठ सहकारी म्हणून तेव्हापासून .हर्षवर्धन पाटील यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले होते. बोरी गावासारख्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात हर्षवर्धन पाटील यांना पाठबळ देण्यात कै.दिनकर शिंदे(बापू) यांची फार मोठी भूमिका होती. आपल्या सच्चा कार्यकर्त्याचे निधन झाल्याचे कळताच भाऊंना अश्रू अनावर झाले. शनिवारी त्यांनी बापूंच्या परिवाराची सांत्वन पर भेट घेऊन बापूंना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

